# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

१३ वा मजला, माझगाव कोर्ट, नेसबित रोड, सरदार बलवंत सिंग धोडी मार्ग
माझगाव, मुंबई— ४०० ०१०

मोबाईल नं : ८५९११९०३६०१ ईमेल: mumbai-dlsa.mh@bhc.gov.in

मुं.जि.वि.से.प्रा.२०२६/757
दिनांक :—३०/०४/२०२६

**वाहन चालक हे पद कंत्राटी/करार पध्दतीने भरणेबाबत.**

**जाहिरात**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मुंबई, या कार्यालयात वाहन चालक संवर्गातील कूशल एक पद (०१) हे कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधी करिता करार पध्दतीने भरावयाचे आहे.

तरी याद्वारे इच्छूक उमेद्वार यांना आवाहन करण्यात येते की, सदर जाहिरात प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून ०७ दिवसाचे आत आवश्यकत्या कागदपत्रांसह अर्ज बंद लिफाफयात या कार्यालयास खालील पत्यावर सादर करावेत. विहीत कालाधीनंतर प्राप्त झालेल्यां अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**पदाचा तपशील खालील प्रमाणे**

| अ.क्र | तपशील | पदसंख्या | भरावयाची पध्दती | कालावधी | आवश्यक पात्रता | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वहन चालक | ०१ | कंत्राटी पध्दतीने | ११ महिने | सोबत जोडलेल्या सहपत्रामध्ये नमूद केल्यानुसार | २१०००/— दरमहा |

**कार्यालयाचा पत्ता :—** १३ वा मजला, माझगाव कोर्ट, नेसबित रोड, सरदार बलवंत सिंग धोडी मार्ग माझगाव, मुंबई— ४०० ०१०. ईमेल — mumbai-dlsa.mh@bhc.gov.in

Approved.

(प.घ.तापडिया)
सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

Secretary
Mumbai District Legal Services Authority.
Mumbai

## वाहन चालकासाठी आवश्यक पात्रता—

१. वाहन चालक हा भारतीय नागरिक असावा.

२. वाहन चालकाची किमान शैक्षणिक अर्हता किमान १०वी उत्तीर्ण असावा.

३. वाहन चालकाजवळ चार चाकी वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.

४. वाहन चालकाजवळ कोणतेही एक शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड/ निवडणूक ओळखपत्र/ पॅनकार्ड) यापैकी एक असणे आवश्यक आहे.

५. वाहन चालकास मराठी लिहता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

६. वाहन चालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा किंवा प्रवृत्तीचा नसावा.

७. वाहन चालकाच्या किमान वय २१ वर्षापेक्षा कमी व ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

८. वाहन चालकास वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

९. वाहन चालक शारीरीकदृष्टया पात्र असावी तसेच दृष्टीने चांगली असणे आवश्यक राहील. तो रातआंधळेपणा या व्याधींनी ग्रस्त नसावा.

१०. वाहन चालकास संबंधित जिल्हयाच्या क्षेत्राची परिपूर्ण भौगोलिक माहिती असणे आवश्यक आहे.

## अटी व शर्ती:—

१. सदरचे पद हे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाचे असून फक्त ११ महिने या कालावधीसाठी कंत्राटी स्वरुपात भरण्यात येणार आहे.

२. उमेदवाराचा या पदावर नोकरी कायम करणेबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

३. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने ११ महिने कालावधीसाठी करारनामा लिहून दयावयाचा आहे.

४. निवड झाले नंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतेही पुर्वसूचना न देता सेवेतून कमी करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहिल.

५. उमेदवारास कालावधीपूर्वी सेवा सोडयाची असल्यास २ महिन्याची अगाउ सूचना किंवा एक महिन्याचे मानधन प्राधिकरणाकडे जमा करावे लागेल.

(प.प्र.तापडिया)
सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई
Mumbai D...

<u>जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई अंतर्गत</u>

| नुकतेच काढलेले पासपोर्ट साईज फोटो |
|---|

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी चालक पदासाठी अर्ज करण्याचा नमुना.

१. अर्जदाराचे संपुर्ण नावं व पत्ता :— ......................................................

२. जन्म तारीख :— ........./......./.........

३. मोटर वाहन चालविण्याचा परवाना कमांक ..........................................

४. मोबाईल कमांक व ई—मेल आयडी :—..............................................

५. शैक्षणिक अर्हता :—

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

६. अनुभव — .............................................................................

७. सोबत कागदपत्रांचा स्वयंसाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

अर्जदाराचे हमीपत्र

मी, याव्दारे, घोषिती करतो/करते की, मी अर्जात दिलेली वरील सर्व माहिति बरोबर आहे आणि जर काही चुकीचे आढळले तर माझी उमेदवारी रदद होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :—

दिनांक :—

उमेदवाराची स्वाक्षरी

# प्रतिज्ञापत्र

मी अर्जदार ........................................................................................ याव्दारे प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो/करते की/ सांगतो/सांगते की, मी मुंबई जिल्ह्याचा रहिवासी आहे. मला कधीही अटक झालेली नाही तसेच माझे विरुध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझे विरुध्द कुठलाही गुन्हा दाखल नाही.

स्थळ :—

दिनांक :—

अर्जदारचे नाव व सही